
ISSN 2231 434

Akhil Maharashtra Itihas Parishad's

# "SHODH NIBANDH SANGRAH"

Multi disciplinary International Research Journal
Peer Reviewed
March 2021 Special Issue

Chief Editor
**Dr. Satish Kadam**
President,
Akhil Maharashtra Itihas Parishad



Guest Edito
**Dr. V. N. Bhosale**
Principal
Shivaji Arts, Commerce & Science College
Kannad, Dist. Aurangabac

Executive Edito
**Dr. Jagdish Bhelonde**
Head & Associate professor
Shivaji Arts, Commers & Science College Kannad

Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**Shodh Nibandh Sangrah**
**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**
**ISSN 2231 4342**

**Akhil Maharashtra Itihas Parishad's**

# "Shodh Nibandh Sangrah"

Multi Disciplinary International Research Journal
Peer Reviewed
March 2021 Special Issue

**Chief Editor**
**Dr. Satish Kadam**
President,
Akhil Maharashtra Itihas Parishad

**Guest Editor**
**Dr. V. N. Bhosale**
Principal,
Shivaji Arts, Commerce & Science College,
Kannad. Dist. Aurangabad

**Executive Editor**
**Dr. Jagdish Bhelonde**
Head & Associate Professor,
Shivaji Arts, Commerce & Science College Kannad

Shivaji College, HINGOLI

**Price: Rs. 1000/-**

**Published by: President, Akhil Maharashtra Itihas Parishad.**
© All rights reserved with the authors & publisher

Attested
Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (M.S.)

**Shodh Nibandh Sangrah**
**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**

**ISSN 2231 4342**

# Editorial Board

**Chief Editor**

**Founder** - Dr. Jaysingrao Pawar

**Editorial Board/Advisory Board**

**President** - Dr. Satish Kadam
**Vice President** - Dr. Chandrakant Chavan
**Secretary** - Dr. Shivraj Bokade
**Joint secretary** - Dr. Kavita Tathed
**Treasurer** - Eng. Ramesh Chandankar

**Member**

Dr. G.K. Mane
Dr. Somnath Rode
Dr. B.D. Kulkarni
Dr. Sarjerao Bhambare
Dr. Mrs. Aruna More
Dr. Zaker Pathan
Dr. Prashant Kothe
Dr. Narayan Gawali
Dr. Urmila Kshirsagar
Dr. Ravi Satbhai

Attested
Assistant Professor

**Published by: President, Akhil Maharashtra Itihas Parishad.**
© All rights reserved with the authors & publisher

**Shodh Nibandh Sangrah**
**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**

**ISSN 2231 4342**

## Review Committee

| | |
|---|---|
| Mr. Deepak Patil | Dubai (UAE) |
| Mr. Satish Kadam | Muscat (OMAN ) |
| Dr. Sudhir Bansod | Zurich (SWITZERLAND) |
| Dr. Maqsood Afajal Jagagirdar | Kalburgi (KARNATAKA) |
| Prof. Virendra Sharma | Jaipur (RAJSTHAN) |
| Dr. Mrs. Binda Paranjape | Banaras (UP) |
| Dr. Prashant Puranik | Bhopal (MP) |
| Dr. Yashvir singh | Charkhidaddri (HARIYANA) |
| Dr. Shivratna Shete | Solapur (MAHARASHTRA) |
| Shri. Yadavrao Kandkurtikar | Nijamabad (AP) |
| Dr. Sopanrao Nimbore | Ashti (Maharashtra) |

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Our editors have reviewed paper with experts committee, and they have checked the paper on their level best to stop furtive literature. except it, the respective authors of the papers are responsible for originality of the paper and intensive thoughts in the papers.

**Published by: President, Akhil Maharashtra Itihas Parishad**
© All rights reserved with the authors & publisher

**Shodh Nibandh Sangrah**
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

# संपादकीय

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य परिषद असून तिची नोंदणी "अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद खार (पश्चिम) मुंबई" नोंदणी क्रमांक 426, तारीख 1 जुलै 1991 याप्रमाणे असून मागील तीस वर्षापासून ही परिषद महाराष्ट्रातील थोर इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांच्या नेतृत्वाखाली अतिशय नेटाने काम करत आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील इतिहासकार, संशोधक, अभ्यासक यांना एक मोठे व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम केले जात आहे. त्याकरिता दरवर्षी परिषदेचे अधिवेशन होत असते. हे अधिवेशन घेण्याकरिता राज्यातील अनेक नामांकित महाविद्यालये आपले प्रस्ताव पाठवत असतात. त्यानुसार मागील तीस वर्षापासून परिषदेची अधिवेशने होत असतात. मागील 28 वे अधिवेशन रयत शिक्षण संस्थेच्या कोल्हापूर येथील "राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय" याठिकाणी पार पडले.

पुढील 29 वे अधिवेशन घेण्याकरिता जळगावसह इतर ठिकाणाहून प्रस्ताव प्राप्त झाले होते. मात्र 22 मार्च 2020 पासून संपूर्ण जग कोरोनासारख्या महामारीने त्रस्त झाले होते. सलग आठ महिने लॉक डाऊन झाल्यामुळे अत्यावश्यक सेवा सोडून, शाळा महाविद्यालयासह भारत बंद होता. सहाजिकच 29 वे अधिवेशन घेण्याकरिता मोठी अडचण निर्माण झाली. त्यामुळे कन्नड जि. औरंगाबाद येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाकडे ई अधिवेशन घेण्याकरिता विनंती करण्यात आली. तेव्हा या महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. विजय भोसले सर आणि इतिहास विभागप्रमुख डॉ. जगदीश भेलोंडे यांनी अतिशय नम्रपणे याकरिता सहमती दर्शविली. एवढेच नाहीतर अतिशय शिस्तबद्धपणे सतत दोन दिवस मेहनत घेऊन ही परिषद यशस्वी करून दाखविली. डॉ. जयसिंगराव पवार यांच्याहस्ते या 29 व्या अधिवेशनाची सुरुवात झाली. डॉ. अनुराधा कुलकर्णी, पुणे याचे बिजभाषण झाले. तर या दरम्यान परिषदेची तीन सत्रे पार पडली. त्यात डॉ. किशन अंबाडे , डॉ. व्यंकटेश लांब आणि प्राचार्य, जी.बी. शहा



Attested
Shivaji College, Hingoli
Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli

ISSN 2231 4342

यांनी सत्राध्यक्ष म्हणून काम केले. शेवटी मा. प्राचार्य, सोमनाथ रोडे यांच्याहस्ते समारोप करण्यात आला.

परिषदेसाठी विविध संशोधक आपले संशोधन पेपर मांडत असतात. या पेपरचे तज्ञ मार्गदर्शकाकडून परीक्षण केले जाते. त्यानंतर योग्य पेपर परिषदेच्या "शोध निबंध संग्रह" या जर्नलमध्ये प्रसिद्ध होत असतात. आनंदाची बातमी म्हणजे "Shodh Nimbandha Sangrah" हे जर्नल NSL/ISSN/INF/2011-12, DATED 25/4/2011, ISSN 2231 4342 याप्रमाणे नोंदणीकृत असून अगदी या ई आवृत्तीपासून ते " PEER REVIEWED JOURNAL" झालेले आहे.

कन्नड येथे पार पाडलेल्या 29 व्या ई अधिवेशनासाठी महाराष्ट्र इतिहास परिषदेचे सर्व कार्यकारिणी सदस्य, निमंत्रित सदस्य आणि सल्लागार मंडळ यांच्यासह संबंधित महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांचे आभार मानून या परिषदेतील 144 संशोधन पेपर संपादित करताना मनस्वी खूप समाधान व्यक्त करत हे ई जर्नल आपल्या हाती देवून पुढील सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

प्रा. डॉ. सतीश कदम
अध्यक्ष,
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

Attested
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS)

PRINCIPAL

ISSN 2231 4342


| | | | |
|---|---|---|---|
| | | डॉ. शरद गावंडे | |
| 40 | छत्रपती शिवाजी राजांच्या स्वराज्याची अर्थनिती | प्रा. डॉ. श्रद्धानंद बा. माने | 240 |
| 41 | शिखर महादेव मंदिर, तेर, ता. जि. उस्मानाबाद एक पुरातत्वीय अभ्यास | श्री. अमोल नारायण गोटे | 244 |
| 42 | छत्रपती शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन | प्रा. दिनेश आर. कचकुरे | 251 |
| 43 | अकोला जिल्हयातील ब्राम्हणेतर व सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते | डॉ. श्याम प्रकाश देवकर | 256 |
| 44 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी: अरुणा असफ अली | प्रो. डॉ. हणमंत महादेव लोंढे | 263 |
| 45 | म्हसला तालूक्यातील उपेक्षित ऐतिहासिक स्थळांचे महत्व | प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे | 268 |
| 46 | हैद्राबादच्या निजामाचे मराठवाड्यातील शेतकरी व शेतमजुरांविषयीचे आर्थिक धोरण व परिणाम | प्रा. डॉ. कोंडेकर आर.एस. | 272 |
| 47 | सण, उत्सव व पर्यावण | Telsang Hanamant Bhimrao | 282 |
| 48 | खोती पध्दती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा. डॉ. गिरे संजय भाऊराव | 280 |
| 49 | महाराष्ट्रतील पर्यटन स्थळे : एक दृष्टीक्षेप | प्रा. डॉ. एच. टी. सातपुते | 289 |
| 50 | प्रतापगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व | डॉ. सुखदेव पांडुरंग शिंदे | 294 |
| 51 | उत्तर कोकणातील आदिवासी समाजाचे होळी सणातील संस्कृतीदर्शन | प्रा. डॉ. एम. जी. मोरे | 299 |
| 52 | भारताची सार्क संघटनेतील भूमिका | प्रा. डॉ. अंबादास नरहरी | 303 |
| 53 | निसर्गयात्री मंडळ-एक सामाजिक संस्था | डॉ. भारती कुमार सुडके | 309 |
| 54 | गांधीजींची आत्मकथा आणि महाराष्ट्र | प्रा. डॉ. गणेश राऊत | 314 |
| 55 | शिवकालीन शस्त्रे | डॉ. विनोद बाबुराव बोरसे | 320 |
| 56 | सर्वव्यापी सुधारक महात्मा फूले यांच्या पुर्व आणि समांतर महाराष्ट्र: एक अभ्यास | डॉ. सुनिलचंद्र सोनकांबळे | 328 |
| 57 | एकविसाव्या शतकातील गावगाडयाचे स्वरूप | डॉ. रामचंद्र झाडे | 333 |
| 58 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार | प्रा. सतीश कुंडलिकराव खरात | 336 |
| 59 | नरहर कुरुंदकरांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम विषयक इतिहासलेखन | डॉ. क्षिरसागर बी. एस. | 340 |
| 60 | छत्रपती राजर्षी शाहू महाराजाचा आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय | प्रा. गायकवाड बाळू भिमराव | 347 |
| 61 | रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांची इतिहास विषयक दृष्टीव” | प्रा. विशाल रामदास रोकडे | 351 |
| 62 | महाभारत कालीन ब्रम्हवादिनी विदुला | वाघ जालिंदर पांडुरंग | 356 |
| 63 | भारताची अण्वस्त्रविषयक नीती – १९९८ पर्यंत | डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे | 361 |




Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq & Dist.Hingoli.(MS.)

**Shodh Nibandh Sangrah**
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal

ISSN 2231 4342

# नरहर कुरुंदकरांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम विषयक इतिहासलेखन

**डॉ. क्षिरसागर बी. एस.**
(इतिहास विभाग प्रमुख)
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
मो. नं. 9850864010
Email:drkbs003@gmail.com

**प्रस्तावना:**

वैचारिक क्षेत्रामधिल मराठवाडयाचे मानबिंदु म्हणुन नरहरकुरुंदकरांकडे पाहिले जाते. मानवी जीवनाशी निगडीत प्रश्नांची उकलकरणा-यांमध्ये त्यांचे स्थानवरचे आहे. इतिहास,राजकारण,समाजकारणइ.क्षेत्रातील वाचनाचा वचिंतनाचा साक्षेपी अविष्कार त्यांच्या इतिहास लेखनातून प्रकटतो. प्रत्येक विषयाच्या मुळसंकल्पने पर्यंत जाऊन त्याचे सखोल विश्लेषन करण्याचे मुलभूतकार्य त्यांनी केले. याशिवाय मराठवाडयातील सांस्कृतिक विकासाचे दरवाजे खुले करुन मराठवाडयाची अस्मिताही जागविली. कुरुंदकरहे जीवनवादी विचारवंत म्हणुन सर्वज्ञात आहे. समाजामध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांवर कुणाचीही भीड-भाड न मानता निर्भिडपणे त्यांनी आपले विचार मांडले आहे. नरहर कुरुंदकर म्हणजे एकचालते-बोलते विद्यापीठ होते. असे म्हटले तरी ती अतिशोक्ती होणार नाही.

भारताच्या इतिहासामध्ये हैदराबाद मुक्तिसंग्राम याघटनेला अनन्य साधारण महत्व आहे. हालढा म्हणजे भारताच्या प्रादेशिक अखंडतेचा लढा होता. म्हणुनच भारत सरकारने पोलिस ॲक्शन नंतर हैदराबाद संस्थान भारतात विलीन केले. हैदराबादचा मुक्तिसंग्राम हा फार मोठा इतिहास आहे. यालढयावर प्रकाश टाकण्याचे कार्य विविध विचारवंत, इतिहासकार यांच्या मार्फत झाले आहे, होत आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम बाबतचा वस्तूनिष्ठ इतिहाससमोर आणणा-या लेखकांमध्ये नरहरकुरुंदकर यांचेकार्य महत्वाचे आहे. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील सर्वघडामोडिवर आधारीत त्यांनी 'हैदराबाद :विमोचन आणि विसर्जन' हाग्रंथ लिहिला आहे. याग्रंथात त्यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामा विषयवस्तूनिष्ठ इतिहासकथन केला आहे. याशिवाय सेलु येथील भांगडीया स्मारक व्याख्यान मालेतील केलेली व्याख्याने म्हणजे हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा मागोवा आहे. कुरुंदकरांनी केलेले लेखन हे स्वामी रामानंद तिर्थ, गोविंदभाऊ श्राफ, अनंत भालेराव,दिगंबरराव बिंदु यांच्या सहवासातील चर्चेतून समोर आले आहे. नरहर कुरुंदकरांनी जेव्हा हैदराबाद मुक्तिसंग्रामा विषयलेखन केले तेव्हा तत्कालीन परिस्थितीत पाहिजे ती साधनेही उपलब्ध नव्हती. काही चरित्रग्रंथ, आठवणी यावरुन लढयाची हकिकत उपलब्ध होती. हिसाधन अपूरे होती, परंतू आज मात्र याघटने संदर्भातील माहितीचे अगणित भांडार आहे. त्यामुळेच हैदराबाद मुक्तिसंग्रामाबाबातचा संपूर्ण इतिहास समोर येत आहे. इतिहासाचे दालन प्रकाशाने उजळून निघेल याच धरतीवर कुरुंदकरांचे मुक्तिसंग्रामविषयक लेखन आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्य लढयाचाच एकभाग

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

आहे. हे केंद्र सरकाने स्पष्ट केल्यानंतर कुठे यालढयातील सत्य घटना समोर येऊ लागल्या. अशा परिस्थीती मध्ये कुरुंदकरांनी केलेल्या लेखनास अनन्य साधारण महत्व आहे. कुरुंदकरांनी हैदराबाद विषयक केलेले लेखन म्हणजे हैदराबाद मुक्तिसंग्रामचा सर्व इतिहास म्हणता येऊ शकत नाही. कारण हैदराबाद मुक्तिसंग्राम म्हणजे काय? तो कोठुन सुरु करता येईल, त्याला कोणत्या दृषिकोणात स्विकारायचे हे ठरविणे अवघड कार्य आहे. याद्दष्ठीने हैदराबादसंस्थानच्या इतिहासाचे विवेचन करतांना कुरुंदकरांनी केलेले भाष्य महत्वाचे ठरते.

नरहरकुरुंदकर हे हैदराबाद मुक्तिसंग्रामात प्रत्येक्षभाग घेणारें व्यक्तिमत्व्. बालवया पासूनच त्यांचा यालढयाशी जवळचा संबंध आला आहे. यालढयामध्ये कुरुंदकरांनी पत्रके वाटणे,मित्रांचे संघटन करणे, निदर्शन करणे, बातम्या पुरविणे हेकार्य केले आहे.[1]तत्कालीन सर्व राजकीय घडामोडीवर त्यांचे बारीक लक्ष होते. इ.स. 1938 ते इ.स.1948 पर्यंत घडलेल्या घटनेवर कुरुंदकरांनी प्रकाश टाकला आहे. त्यामुळेच त्यांनी हैदराबादचा आरंभ बिंदु इ.स. 1938 पासून मानला आहे. कारण 24 ऑक्टोंबर 1938 ला गोविंदराव नानलयांनी 10 सहका-यांसह हैदराबाद येथे सत्याग्रह केला. हे जरी सत्य असले तरीही इ.स 1938 अगोदर हैदराबादेत सभा,संघटना,आर्यसमाज, हिंदुमहासभा यांच्या सहकार्याने इ.स. 1920 पासूनच अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिपत्याखाली सर्वपरिने जनतेत जनजागृतीचे कार्य झाल्याचे दिसून येते. अनंत भालेरावयांनी हीहैदराबाद मुक्तिसंग्रामाचा आरंभ बिंदुहा अप्रत्यक्षपणे 1938 च्या अगोदरील आहे असे नोंदविले आहे. इ.स. 1908 पासुनच सरकारच्या निषेधार्थ निदर्शने मराठवाडयात झाली आहे.[2]याचे उत्तम उदाहरण म्हणजे औरंगाबादेतील अनंत लक्ष्मण कान्हेरेने केलेला जॅक्सनचा खुन होय.

हैदराबादमुक्तिसंग्रामाचे विवेचनकरतांना कुरुंदकरांनी मराठवाडयाचे महत्व विशद केले आहे. मराठवाडयाला ऐतिहासिक व सांस्कृतिक, संत महात्म्यांच्या मोठा वारसा आहे. मराठवाडयामुळेच महाराष्ट्राचा एकजीवपणा टिकला आहे. नस्ता महाराष्ट्र अस्तित्वातच आला नसता. हैदराबाद विरोधात मराठवाडयाच्या जनतेने जो लढा लढला तो साधा सुधा लढा नव्हता तो करा या मरा या पध्दतीचा होता. "हैदराबाद मुक्तिसंग्राम हा केवळ संस्थानांच्याविलीनीकरणाचा लढा नव्हता तर तो भारताच्या प्रादेशिक अखंडतेचा लढा होता."[3] मराठवाडयातील लोकांचा यालढयामधील सहभाग पाहता बलीदानाची परंपरा मोठी होती. मराठवाडा मुक्तिसंग्रामामध्ये हुतात्मा गोविंदराव पानसरे व हुतात्मा बहिर्जी नाईक हे बलिदान करणारे दोन हुतात्मे होय.[4] मराठवाडाही जिद्दीमानसांची भूमी आहे, असे अनंत भालेरावांनी नमुद केले आहे. कुरुंदकरांनी या लढयाचे दोन वैचारिक मतप्रवाह म्हणजे निजाम मीर उष्मान अलि खाँबहादुर व महात्मा गांधी आहेत असे नोंदविले आहे.

हैदराबादसंस्थानमध्ये 1940-42 पर्यंत शिक्षणाची वाईट स्थिती होती. प्राचीन बूरसटलेल्या, मागासलेल्या चालीरिती, प्रथा, वेठबिगार, अस्पृश्यता, गुलामगीरी इ. बाबी अस्तिवात होत्या. सुधारणेचा मागमुसही संस्थानात नव्हता माणूस म्हणून मानसाला संस्थानात महत्वच नव्हते. परंतू याचे कुठलेही सोयर-सुतक निजामास नव्हते. निजामाचा प्रथम उद्देश हा स्वतंत्र सार्वभौम राजा होण्याचा होता. इंग्रजां सोबत आमचे झालेले करार हे दोन मित्रांमध्ये झालेले आहे. इंग्रज एक सार्वभौम राष्ट्र असल्याने आपणही सार्वभौम आहोत. आम्हालाहीहिजमॅनेष्ट्रीलावण्याचा अधिकार आहे. याद्दष्टीने कुरुंदकर नोंदवितात कि, निजामाचा विचार एक

Attested

Assistant Professor
College,Hingoli.
Dist.Hingoli.(MS.)

**Shodh Nibandh Sangrah**
**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**
**ISSN 2231 4342**

संस्थानिक म्हणून करु नये, तर त्याचा विचार अतिशय श्रीमंत व तेवढाच चिंगुस, महत्वाकांक्षी, पाताळयंत्री,चाणाक्ष, मुत्सुद्दी, कायदा सुव्यवस्थेचा तज्ञ व प्रजेचा शतु म्हणुन करावा.[5] ही निजामाच्या व्यक्तिमत्वाची वास्तूनिष्ठ ओळख ते आपल्या विवेचनात करतात. हैदराबादचा सार्वभौम राजा होण्याच्या दृष्ठीने निजामाने स्व:ची स्वतंत्र नाणे व्यवस्था, पोस्ट, टेलीग्राम, रेल्वे, स्वतंत्र सिव्हिल सर्व्हीस, स्वतंत्र्य विद्यापीठ अशी यंत्रना निर्माण केली होती. शिवाय इंग्लड, फ्रान्स, पोर्तुगाल, बेल्जीयम, इजिप्त, तूर्कस्थान, सौदी-अरब, अफगानिस्थान इ. राष्ट्रांमध्ये एकलॉबी तयार केली होती. जागतिक बँकेमध्ये निजामाच्या ठेवी होत्या. हे सर्व उद्योग पाहता निजाम किती चाणाक्ष, पाताळयंत्री होता याची जाणीव होते. म्हणजे त्याने एक स्वतंत्रराष्ट्र निर्माण होण्याच्या दृष्ठीने सर्व सिध्दता केली होती. प्रजेवर आपला जाब निर्माण राहावे यासाठी निजामाने 'दिनदार सिद्दीकअंजूमन' वइत्तहादूलमुसलमीन'.[6] यादोनसंघटना निर्माण केल्या होत्या. तो प्रजेचा सर्वात मोठा शतु होता. जगातील श्रीमंतापैकी एक निजाम होता. परंतू त्यांचा हा पैसा प्रजाकल्याणासाठी नव्हता. हिंदु तर सोडा परंतू मुस्लिम प्रजेचेही त्यानेकल्याण केले नाही. मुस्लिम समाजातील फार मोठा वर्ग हा हलक्या प्रतीचाच व्यवसाय करीत होते. संस्थानात निजामाने गरजेपेक्षा जास्त सुधारणा होऊच दिल्या नाही. केवळ 10% प्रजा शिक्षित केली. म्हणूनच कुरुंदकर म्हणतात "निजामाचा अभ्यास म्हणजे मित्राचा नव्हे तर तो शतुचा अभ्यास आहे.[7] कारण एकुण निजामाचा सर्व प्रपंचहा स्वतंत्र सार्वभौम राजा होण्याचा होता. हा प्रपंच सिध्द झाला असता तर हैदराबाद संस्थान मधील प्रजेच्या अन्याय, अत्याचारास कोणी ही थांबवू शकले नसते. जन्मभर संस्थानातील जनतेला गुलामगीरीचे जिवन जगावे लागले असते.

हैदराबाद संस्थानच्या लढया विषयी मा. गांधी यांचा दृष्टिकोण महत्वाचा होता. गांधीजींचा संस्थांनाकडे पाहण्याचा सुरुवातीचा दृष्टिकोण चांगला होता. परंतू निजामाचा मुळचेहराजेव्हा त्यांच्या लक्षात आला तेव्हा गांधीच म्हणाले की, संस्थानिक हे भारतीय स्वातंत्र्याचे अवशेष नसून सर्व संस्थानिक हे आपल्यावर लादल्या गेलेल्या पारतंत्र्याचे खांब आहे. हेखांबगळूनपाडल्यासाठीजनता सुखी होऊ शकणार नाही. यामुळेच गांधीजींनी हैदराबादेतील जनतेला उद्देशुन म्हटले कि, भ्याडा प्रमाणे पळून जाण्या पेक्षा लोकशस्त्रे घेऊन लडत आहेत हे माझ्या अहिंसेत बसते.[8] परिणामता हैदराबाद लढयाला उग्रस्वरुप प्राप्त होऊन निजाम विरोधात वंदेमातरम चळवळ, हिंदुमहासभेचा सत्याग्रह, स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह, आर्यसमाजाचा सत्याग्रह आशी अनेक आंदोलने सुरु झाली म्हणजे गांधींच्या एकुण पाठींब्यामुळेच हया लढयाने जनआंदोलनाचे स्वरुप धारणकेले. हे कुरुंदकरांनी प्रामुख्याने समोर आनले आहे. जिना व गांधी यांच्यात तडजोडहोऊन माऊंटबॅटनने भारत-पाकफाळणीला मान्यता दिल्याने निजामास स्वतंत्र होण्यास कायद्याने बळकटी येणार होती. हा आधार होऊनच निजामाने फर्मान काढले की, हैदराबाद भारत अथवा पाकिस्तान यामध्ये विलीन न होता नवे राष्ट्र म्हणुन आम्ही स्वतंत्र राहणार आहे.[9] यानिजामाच्या घोषणेमुळे हा लढा किती प्राणंतिक होता. हे आपल्या लेखनातून स्पष्ट करतांना कुरुंदकर परांजपेच्या भाषणाचा संदर्भ देतात. देहाची ऊंची सोडे तिन हात आहे. हे यानंतर तुम्ही विसरावे ती उंची तिनच हात आहे, अर्ध्याहात उंचीचे डोके देहावर नाही असे समजून महामृत्यूंजयाचा जप करीत तुम्ही निर्भयपणे चला. यालढयात तुमच्या पैकी किती लोक मारले जातील याचा नेमनाही. जीवंत राहिल त्यांना साडेतिन हाताचा देह

Attested

**Shodh Nibandh Sangrah**
**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**
**ISSN 2231 4342**

मिळेल. जे मरतील तेदेशाच्या कारणासाठी मेले असे मानायचे.[10] यालढ्याची तिव्रता आणि उग्रता मोठी होती. भारतात इतर ठिकाणी अशी परिस्थती नव्हती. तुरुंगातील सत्याग्रहींची संख्या वीस हजार तर भुमिगत राहुन सशस्त्र आंदोलनात सहभाग घेतलेल्यांची ही संख्या वीसहजार होती. यावरुन यालढयाची व्याप्ती समजते.

कुरुंदकरांनी आपल्यालेखनातून हैदराबादच्यामुक्तिसंग्रामातील अनेक घटनांना उजाळा दिला आहे. 'गुंडा' बिदर, अर्जापूर' इ. गावांवर झालेल्या अत्याचाराचा मागोवा घेत कुरुंदकर पानसरे ते शोईबूल्लाखान यांच्या पर्यंत हुतात्माची फळी या संग्रामात कामी आली अशा प्रकारे संग्रामातील शहीदांच्या कार्याचेही तेमहत्वविशद करतात. याशिवाय उमरी बँक लूट घटनेतील अनेक गैरसमज दुर करुन ह्यालुटीतील एकहीपैसा इतरत्र गेला नाही हेस्पष्ट करतात. अशाप्रकारे हैदराबाद विलीनीकरणामागील सत्यता कुरुंदकरांनी प्रकाशात आणली. सर्वसामान्य लोकांना 'रझाकार' संघटनेचा प्रमुख कासीम रझवी हाच प्रथम शत्रु वाटते. परंतू ते खरे नाही, तर 'इत्तेहादूलसंघटनाजन्मालाघालने, वाढविणे व रझाकारांचे स्वयंसेवक दल शासनाच्या पाठींब्यावर उभेकरणे हे सर्व उद्योग निजामाचे होते. रझवी वाट्टेल त्याघोषणा जरीकरीत असलातरी तेनिजामाच्या हातचे एकप्यादे होते.[11] धर्मांधता वाढविणे, भावनावेग पूर्ण विदेशी व कृत्वगाजविणे आणि मुस्लिमांचे संघटनकरणे यासाठी कनिष्ठ्बुध्दीचा, बेताल आणि बेछुट माणूसइतकेच निजामाच्यादृष्टिने कासिम रझवीचे स्थानहोते. सर्वअत्याचाराचा कर्णधार हानिजामहोता. आपले सर्व उद्देश पूर्ण व्हावे. यासाठीच रझवीला इत्तेहादूलमुसलमीन यासंघटनेचा अध्यक्ष निजामाने बनविले होते. म्हणजे निजामाच्या दृष्टिमधिल रझवीचे स्थानकाय हेहीकुरुंदकरांनी आपल्या लेखनाद्वारे समोर आनले आहे.

हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा लढा हा भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा एकभाग होता. कारण हैदराबाद संपल्या शिवाय भारताची प्रादेशिक अविभाज्यता सिध्द्झाली नसती. ही वस्तूस्थिती आहे. याबरोबरच कुरुंदकरांनी यालढयाच्या दोन बाजू स्पष्ट केल्या आहे. "हासंघर्ष जरी स्वामीजी व रझवीमध्ये दिसला तरी निजाम व महात्मा गांधीयांच्या मध्ये होता".[12] अशा पध्दतीने त्यांनी लढ्यातील मुळसंघर्षाचा बिंदू स्पष्ट केला. हैदराबाद एक स्वतंत्र राष्ट्र करण्याच्या दृष्टिने निजामाचे सर्वपातळीवर प्रयत्न चालू होते. त्यामुळे सरळ मार्गाने हैदराबादचा प्रश्न सुटेलही आशाधूसर झाली होती. खरे म्हणजे हा प्रश्न पोलीस कारवाही शिवाय सुटणार नाही याची भारतीय नेत्यांना जाणीव होती. भारतीय नेते फक्त माऊंट बॅटन परत जाण्याची वाट पाहत होते. कारण त्या शिवाय ठोस कार्यवाही करणे, अडचणी निर्माण करणारे होते. ही तत्कालीन वस्तुस्थिती त्यांनी मांडली आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतरही एका वर्षापेक्षा अधिक काळ हैद्राबादचा प्रश्न सोडविण्यासाठी लागला आहे. हा काळ सर्वसामान्य भारतीय जनतेला मोठा कालावधी वाटत होता. परंतु हैद्राबाद मधिल परिस्थिती पाहता हा कालावधी फार कमी आहे. कारण या लढयाची तिव्रता व दाहकता फार मोठी आहे. "हैद्राबादचा मुक्तीसंग्राम हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक उज्ज्वल आणि लोकविलक्षण असे पर्वहोते.[13]अशा दृष्टीने कुरुंदकर भारतीय स्वातंत्र्य लढयातील मुळ कणा हा हैदराबाद मुक्ति शिवाय साधनार नाही. व त्याशिवाय भारतीय अखंडता सुध्दा प्राप्त होणार नाही. असे मत व्यक्त करतात.

Attested
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

भारत-पाकफाळणी नंतर काश्मिर प्रश्नावरुन पाकिस्तानने कुरापती सुरु केल्या. यामध्ये पाकिस्तानचा पराभव झाल्याने निजाम 'जैसेथे' करारावर सहीकरण्यास तयार झाला. परंतू वाटाघाटीचे गु-हाळसुरुच होते. तेसंपणारे नव्हते. 'जैसेथे' करार होणे म्हणजे हा दोन स्वतंत्र राष्ट्रामधील करार आहे. त्यासंबंधी ही वाटाघाटी होणे गरजेचे आहे. याशिवाय आमच्या विदर्भाचे काय असाही प्रश्न निजामाने समोर केला होता. म्हणजे यावाटाघाटी होणे अशक्य कोटीतील बाब होती. यावरुन हा प्रश्न केवळ पोलिसकारवाही शिवाय सुटणार नाहीहि सत्यता होती. वाटाघाटी न होणे यामध्येच भारताचे हित होते. कारण निजामाला शहाणपणा सुचलानाही हेच पथ्य भारताच्या माथी पडले. वाटाघाटी नुसार निजामाने अलियावर जंगच्या प्रस्तावाला मान्यता दिली असती तर महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश ही राज्य अस्तित्वात आली नसती. भाषावार प्रांत रचनाही झाली नसती. हैद्राबादच्या विलिनीकरणामध्ये महाराष्ट्र कर्नाटक व आंध्रप्रदेशाचे अस्तित्व होते. ही कुरुंदकरांची दृष्टी वास्तववादी आहे. खरे म्हणजे हैद्राबादचे भौगोलिक स्थान पाहताते स्वतंत्र्य राष्ट्र म्हणून निर्माण होऊ देणे हे भारतासाठी फार मोठे संकट होते. हेसंकट भारतीय नेत्यांनी मुत्सद्दीगीरीने संपविले. नेहरुंनी स्पष्ट केले कि,भारतामधून फक्त एक पाकिस्तान नवीन राष्ट्र अस्तित्वात येत आहे. पाक-भारत अशी दोन राष्ट्रे नव्हे. म्हणून पाक सोडून उरलेला भूप्रदेशहा भारताचा सार्वभौमभाग आहे. हि भूमिका आंतराष्ट्रीय स्तरावर सर्वांनामान्य करावी लागली.[14] यामुळे निजामाला बाहेरुन मदत मिळण्याचा अधिकृत मार्ग नेहरुंच्या मुत्सद्दीपनाने बंद झाला. तरीही झेकोस्लो-व्होकीयाने पोर्तुगालला शस्त्रे दिली. पोर्तूगालने ती गोवा येथे उतरुन घेतली. गोव्यातून हिशस्त्रे चोरुन पोहचवण्याचे काम प्रसिध्द आंतरराष्ट्रीय तस्कर सिडने कॉटन यांनी केले. परंतू विमानातून जातील अशीच शस्त्रे निजामहैदाबादला आनूशकला. तोफा, रणगाडे, रणगाडे विरोधी तोफा, विमान विरोधी तोफा अशी अवजड हत्यारे निजामाला मिळू शकली नाही.[15] हे सर्व नेहरुंच्या मुत्सद्दीपणाचे फळ आहे. नसता हैद्राबाद प्रकरण हेफार मोठे दुखने झाले असते.

दिनांक 21 मार्च 1948 नंतर माऊंटबॅटनच्या जागेवर राजगोपालचारी गर्व्हनर जनरल झाले. ब्रिटीश सेनापती ही गेले. जनरल करिअप्पा हे भारताचे सर सेनापती झाले. त्यानंतर भारताने निजामाची आर्थिक कोंडी आंतरराष्ट्रीय स्तरावरुन अधिकृत कोणी ही मदत करु शकणार नाही अशी परिस्थिती निर्माण केली. सर्व प्रथम हैद्राबादच्या नाण्याला भारतात बेकायदेशीर ठरविले. हैद्राबाद हा भारताचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे अंतर्गत प्रश्नात इतर राष्ट्रांनी ढवळा-ढवळ केल्यास आम्ही त्या राष्ट्रास आंतरराष्ट्रीय कायद्या नुसार युनोत खेचू असे वातावरण तयार केले. नेहरु ब्रिटीश पंतप्रधानास म्हणाले कि, संस्थानला विदेश संबंध जोडता येणार नाही, हातुमचाच करार आहे. तो तुम्हीच मोडला तर तुमच्या 345 कोटीच्या भारतातील भांडवलाचे आम्हीही राष्ट्रीयीकरण करुन टाकु.[16] त्यामुळे ब्रिटीशांना भारताच्या बाजूने उभे राहावे लागले. कुरुंदकरांनी नेहरुंच्या राजकारणाचे खरे स्थान ओळखावे असेही. याद्वारे नमुद केले.

आर्थिक ताळेबंदी झाल्याने निजाम जागा झाला व माऊंटबॅटन प्रस्ताव मंजूर करुन वाटाघाटी करण्यास आपण तयारआहे, अशी शिफारस निंजामाची होती. सरदार वल्लभभाई पटेलांनी निजामास कळविले. माऊंटबॅटन प्रस्ताव आता इंग्लंडला गेलाआहे. बिनशर्त विलीनीकरण ऐवढेच आताबाकी आहे.[17]शेवटी

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

निजामास कळविण्यास आले 24 तासाच्या आत विलीन व्हा नसता भारतीय फौजा संस्थानात घुसतील 13 सप्टेंबर 1948 ला भारतीय फौजा हैदराबादेत घुसुन हैदराबादचा प्रश्न संपविला. याघटनेला 'ऑपरेशनपोलो' असे सांकेतिक नाव देण्यात आले होते. अशा प्रकारे नरहरकुरुंदकर यांनी आपल्या विवेचनातून हैदराबाद मुक्तिसंग्रामचा इतिहास कथन केला आहे. हेत्यांचे कार्य ऐतिहासिक दृष्टया महत्वाचे आहे.

**सारांश :**

नरहर कुरुंदकरांनी हैदराबाद मुक्ति संग्राम विषयक लिखाणाद्वारे अनेक सत्य घटना समोर आणल्या. त्यांनी निजामी राजवटीतील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक एकुणच सर्वांगीण स्थितिवर प्रकाश टाकला. याशिवाय हैदराबाद स्टेट कॉंग्रसच्या चळवळी, विद्यार्थी चळवळी या सर्व घटणावर त्यांनी केलेली चर्चा महत्वाची ठरते. हैदराबादचा इतिहास कथनकरतांना संस्थानाची भौगोलिक स्थिति, निजामाचे उद्देश, हिन्दुमुस्लिम जनतेचे संस्थानातील स्थानयावर कुरुंदकरांनी टाकलेला प्रकाश त्यांच्या ऐतिहासिक ज्ञानाची पावती ठरते. याशिवाय म.गांधी पं. नेहरु, सरदार पटेलांचा निजामाकडे पाहण्याचा दृष्टीकोण काय? यावरही कुरुंदकरांनी दृष्टीक्षेप आहे. इत्तेहाद-उल-मुस्लमीन संघटनेचे स्वरुप, निजामाचे परराष्ट्र धोरण, लष्करी व्यवस्था समजण्यासाठी कुरुंदकरांचे विवेचन मौलिक स्वरुपाचे आहे. नांदेडचे झेंडा प्रकरण, उमरी बँक लूट प्रकरण या घटनांचा सत्य इतिहास त्यांच्या लेखनातून दिसून येते. त्यामुळे त्यांच्या लेखनास महत्व प्राप्त होते.

हैदराबाद मुक्ति संग्रामातील विविध प्रवाहाचा परामर्ष घेऊन त्यातील अनेक अदृष्य संबंधाचे - घटनांचे स्वरुप त्यांनी आपल्या लेखनातून स्पष्टकेले आहे. कुरुंदकरांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम विषयक लिखाण हे बरेचशे ऐकुव स्वरुपाचे असले तरी ते ज्या व्यक्तीं कडून त्यांच्याकडे आले त्या व्यक्तीचे व्यक्तीमत्व हेच या लिखानाचा दर्जा ठरविणारे आहे. स्वामी रामानंद तिर्थ, गोविंद भाई श्राफ, अनंत भालेराव, दिगंबरराव बिंदू यांच्या सहवासातील चर्चेतून कुरुंदकरांचे मुक्तिसंग्राम विषयक लेखन समोर आले आहे. कुरुंदकरांचाही बाल वयापासून प्रत्यक्ष लढ्यामध्ये सहभाग होता. त्यामुळे प्रत्येक घटनेची जाण त्यांना होती. त्यांनी आपल्या विवेचनाद्वारे हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये घडलेल्या अनेक घटनांना उजाळा दिला. कुरुंद करांच्या लिखनातून हैदराबाद लढा म्हणजे काय? त्याचे स्वरुप कसे होते, तोल ढा किती हिंसक व उग्र होता. याची जाणीव होते. कुरुंदकरांनी हैदराबाद मुक्ति संग्राम विषयक केलेले लिखान हे अत्यंत महत्वाचे आहे. ते वस्तूनिष्ठ स्वरुपाचे आहे. परंतू तो सर्व हैदराबादचा इतिहासही होऊ शकत नाही. कारण हैदराबाचा इतिहास हे इतिहासाचे फार मोठे व्यापक क्षेत्र आहे. त्यासाठी 700-800 पानांचा ग्रंथही कमी पडेल. असे असले तरीही त्यांचे हे विवेचन हैदराबाद मुक्ति संग्रामाच्या इतिहासाचे नव्या व्यापक दृष्टीने अभ्यास करण्यास लावणारे आहे. भारताच्या इतर प्रांतातील लढयापेक्षा हैदराबादसंस्थानातील लढयाचे स्वरुप निराळे होते. हा लढा म्हणजे मुस्लिम जातीय वादाच्या एका प्रबळ केंद्र विरुध्द चालू असणारा हिंदू प्रजेचा लढा होता. यामुळे हैदराबाद मुक्ति संग्रामाच्या इतिहासाचे नव्या दृष्टीने व्यापक स्वरुपात अभ्यास करण्याचेही आव्हाण कुरुंदकरांनी त्यांनी केले आहे.

Attested

**Assistant Professor**
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**ISSN 2231 4342**

**संदर्भसुची :**

1. वाडीकर, भु. द.(2005). ज्ञानर्षी नरहर कुरुंदकर : नांदेड.संगतप्रकाशन. पृ. 44-45.
2. अनंत,भालेराव.(1957).हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशकलिमिटेड. पृ. 44.
3. जोशी, द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन. पृ. (प्रस्ता).
4. अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशकलिमिटेड.पृ.04
5. जोशी,द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ.37
6. जोशी,द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन. पृ.179
7. जोशी,द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन. पृ.188
8. डोळे,ना.प. (1998). 'हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम :मुंबई. ग्रंथालीप्रकाशन.इंडियन एज्युकेशन सोसायटी. पृ.26
9. अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशक लिमिटेड.पृ.412
10. परळीकर, अशोक.(1975). हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा :पुणे. राजहंसप्रकाशन.(प्रस्ता), पृ. 25
11. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ.17
12. अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशक लिमिटेड. पृ. 166
13. परळीकर, अशोक.(1975).हैदराबाद मुक्ति संग्रामातील अज्ञात कथा :पुणे. राजहंसप्रकाशन.पृ. 17
14. अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशकलिमिटेड पृ. 415
15. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ 234
16. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ 135
17. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ 136

Attested

**Assistant Professor**
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)